# प्रेसनोट दि.२४/०२/२०२०

## विशेष मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या परिणामकारक कारवाई

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाहतुक शाखेकडील कारवाई

सध्या पिंपरी-चिंचवड आयुक्तालयात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करुन वाहन चालवित असल्याचे दिसुन येत आहे. अनेकदा वाहन चालक बेशिस्त आणि वेडी वाकडी भरधाव वेगाने चालवत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे अपघात होऊन लोकांच्या जिवीताचे नुकसान होत असते. अशा वाहन चालकांवर वचक बसावा याकरीता पिंपरी-चिंचवड आयुक्तालयातील वाहतुक शाखेकडुन दि.०१/०१/२०२० ते दि.२०/०२/२०२० पर्यंत विशेष मोहिम राबवुन नाकाबंदी अंतर्गत खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| अ.क्र | महिना | नाकाबंदी दरम्यान एकुण किती वाहने चेककेली | किती वाहनांवर दंड आढळुन आला | किती वाहन चालकांनी दंड भरला | वसुल करण्यात आलेल्या दंडाची रक्कम रुपये | दंड न भरलेल्य वाहन चालकांवर केलेली कारवाई |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जानेवारी | ५७९१ | २२२४ | २१८४ | ९३७३०० | लायसन्स जमा-३१<br>वाहन जमा-०१ |
| २ | फेब्रुवारी | ५०६५ | २०५३ | २०२७ | ८५७२०० | लायसन्स जमा-२६ |
| | एकुण | १०८५६ | ४२७७ | ४२११ | १७९४५०० | लायसन्स जमा-५७<br>वाहन जमा-०१ |

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड मा.पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त निलीमा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. यापुढे देखील वाहतुक शाखेकडील विशेष मोहिमे दरम्यान कारवाई करुन नागरिकांची वाहने जप्त करुनत्यांचेवर योग्य तो खटला दाखल करुन मोटार वाहन कोर्टात पाठविण्यात येणार आहे. तसेच जास्तीत जास्त वाहनांची तपासणी करुन त्यांचेवर ई-चलन कारवाई केलेली असेल तर दंड वसुल करुन कारवाई केली जाणार आहे. वाहतुकीचे नियम न पाळणारे वाहन चालक निदर्शनास आल्यास त्यांचेवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच वाहतुक शाखेकडुन सर्व वाहन चालकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी वाहतुकीचे सर्व नियम पाळावेत. जेणेकरुन भविष्यात अपघाताचे प्रमाण कमी होईल.

(प्रसाद गोकुळे)
पोलीस निरीक्षक,
वाहतुक शाखा,पिंपरी-चिंचवड

Scanned with CamScanner